ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
R. g. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख २५ जुलै, १९५६ | अंक ३०

## विविध माहिती

**सायकलवरील कर रद्द**—मद्रास कॉर्पोरेशननें गेल्या फब्रुआरी महिन्यांत सायकलवरील कर रद्द करण्याचा ठराव केला होता. पण राज्य सरकारनें उत्पन्न कमी होईल म्हणून ठरावास मान्यता दिली नव्हती. आतां सरकारनें आपला निर्णय बदलला आहे. मद्रास शहरांत ५०,००० सायकल वापरणारे असून ते कॉर्पोरेशनला दरसाल सुमारें २ लाख रुपये कर म्हणून देत होते.

**ऊंस पिकविणारे भागीदार झाले**—कोपरगांव तालुक्यांतील चांगदेव शुगर मिल्स ह्या कारखान्याचे भाग घेऊन भागीदार होण्याची सवलत ऊंस पिकविणाऱ्या ३०० शेतकऱ्यांना देण्यांत आली आहे. कारखान्याची ऊंस गाळण्याची मर्यादा ८०० टनांवरून १,००० टनांपर्यंत वाढविण्यांत आली असल्यानें उसाचा अधिक पुरवठा व्हावा म्हणून ही सवलत देण्यांत आली आहे.

**रशिआला अमेरिकेचें पोलाद**—अमेरिकेच्या व्यापार-खात्यानें ११ लाख डॉलर्स किंमतीचें पोलाद रशिआकडे निर्यात करण्यास परवानगी दिली आहे. १९४७ सालानंतर कम्युनिस्ट राष्ट्राला अमेरिकन पोलाद मिळाल्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. मोटारी बांधण्यासाठीं उपयोगी पडेल असें हें पोलाद आहे.

**भारतीय विद्यार्थ्यांना शिक्षण**—पश्चिम जर्मनींतील एका उपराज्याच्या सरकारनें भारतीय विद्यार्थ्यांना औद्योगिक शिक्षण देण्याची तयारी दाखविली आहे. राज्यांतील तांत्रिक शिक्षणाच्या शाळा आणि कारखाने ह्यांमधून ६०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्याची व्यवस्था केली जाईल. भारतांत एक तांत्रिक शिक्षणाचें कॉलेज काढण्याबाबत सहकार्य देण्याचीहि तयारी दाखविण्यांत आली आहे.

**राज्य सरकारांना मदत**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत पाणीपुरवठा व आरोग्यविषयक कामांसाठीं लागणाऱ्या पैशाची मागणी निरनिराळ्या राज्यसरकारांकडून भारतीय सरकारकडे करण्यांत आली आहे. राज्यसरकारांना कर्जें व मदत म्हणून रकमा मंजूर करण्यांत येतील. ह्या कामासाठीं मध्यवर्ती सरकारनें दुसऱ्या कार्यक्रमांत ४० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**रासायनिक खतांचें उत्पादन**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रासायनिक खतांचें उत्पादन वाढविण्याच्या कांहीं योजना आहेत. ह्या बाबतींत परदेशांत झालेल्या प्रगतीचा व अद्ययावत् उत्पादनपद्धतीचा अभ्यास करण्यासाठीं भारताच्या उत्पादन-खात्यांतील एक अधिकारी, डॉ. मुखर्जी युरोपच्या व अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले आहेत.

**अणुशक्तीवर चालणारीं विमानें**—अणुशक्तीवर चालणारीं एंजिनें बांधण्याचें काम रशिआनें सुरू केल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. निरनिराळ्या प्रकारच्या बोटींचीं एंजिनें, रेल्वेचीं एंजिनें व विमानांचीं एंजिनें ह्यांच्यासाठीं अणुशक्तीचा उपयोग करण्यांत येणार आहे. अणुशक्तीवर चालणारीं विमानें ताशीं १,००० मैल वेगानें जाणारीं असतील.

**औरंगाबाद येथें लॉ कॉलेज**—औरंगाबाद येथें माणिकचंद पहाडे लॉ कॉलेज ऑगस्टच्या सुरुवातीला उघडलें जाईल. श्री. पहाडे हे एक दिवंगत संस्थानी राजकीय पुढारी होते. त्यांच्या स्मृतीसाठीं कॉलेज काढण्यांत येत आहे. औरंगाबादच्या कांहीं संघटनांनीं ५५,००० रुपये जमविले असून हैदराबादचें सरकार ५०,००० रुपयांची मदत देणार आहे.

**सीलोनमध्यें पिकांच्या विम्याची योजना**—सीलोनच्या सरकारनें पिकांच्या विम्याची योजना अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. अतिवृष्टीनें अगर अनावृष्टीनें पिकांचा नाश झाल्यास शेतकऱ्याला विम्याचा फायदा ह्या योजनेप्रमाणें मिळूं शकेल. ह्या बाबतींत माहिती जमविण्याचें काम चालू करण्यांत आलें आहे. सीलोनमधील पिकांपैकीं १० टक्के पीक पावसाच्या लहरीपणामुळें नष्ट होतें असें आढळून आलें आहे.

**कृत्रिम रबराचा कारखाना**—उत्तर प्रदेशांत पुढील वर्षी कृत्रिम रबर निर्माण करण्याचा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. कारखान्यांसाठीं १२ कोटी रुपये भांडवल लागेल. तें राज्य–सरकार आणि भारतीय सरकार मिळून उभारणार आहेत. उत्तर प्रदेशांतील साखरकारखान्यांतून पॉवर अल्कोहल मोठ्या प्रमाणावर मिळण्याची शक्यता असल्यानें कारखाना तेथें काढण्यांत येत आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव**—आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचें ९ वें अधिवेशन झेकोस्लोव्हाकियांत भरलें होतें. महोत्सवांत अमेरिका, ब्रिटन, भारत, रशिआ, चीन, इटली, फ्रान्स, इत्यादि ४९ राष्ट्रांनीं भाग घेतला होता. भारतामधून सरकारी प्रतिनिधींसेरीज विमल रॉय सारखे कांहीं दिग्दर्शक व नटनटी गेल्या होत्या.

**इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशन**—इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशनचा दुसरा वार्षिक अहवाल सरकारला सादर करण्यांत आला आहे. १९५४–५५ च्या आर्थिक वर्षात कॉर्पोरेशनला ९०.१५ लाख रुपये तोटा आल्याचें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. ह्या रकमेंत ४०.६३ लाख रुपयांचा घसारा समाविष्ट झालेला आहे.

**हुबळी येथें विमानतळ**—कर्नाटकांतील हुबळी ह्या शहराजवळ विमानतळ बांधण्यांत येणार असल्याची माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. विमानतळासाठी लागणाऱ्या जागेची निवड करण्यांत आली असून ती ताब्यांत मिळतांच कामाला प्रारंभ होईल. काम पूर्ण होण्यास १८ महिने लागतील आणि त्यासाठी १८ लाख रुपये खर्च येईल.

**भारतीय चित्रपटांची निर्यात**—भारतामध्यें तयार झालेले बालपट परदेशांत निर्यात करण्याचें कार्य करण्यासाठी एक कौन्सिल स्थापन करण्यांत येणार आहे. सध्यां चित्रपटांच्या निर्यातीवर नियंत्रणें नाहींत. किनिया, युगांडा, टँगानिका आणि वेस्ट इंडीज ह्या देशांकडून भारतीय चित्रपटांना चांगली मागणी येत असते.

**औरंगाबादला नवें वैद्यकीय कॉलेज**—औरंगाबाद येथें ता. १५ ऑगस्टपासून एक नवें वैद्यकीय कॉलेज चालू करण्यांत येईल. कॉलेजासाठी हैद्राबाद राज्य सरकारनें ५०,००० रुपयांची देणगी दिली आहे. तूर्त कॉलेजचे वर्ग औरंगाबाद येथील निझामाच्या बंगल्यांत भरविण्यांत येतील. प्रारंभीं ५० विद्यार्थी अभ्यासक्रमास सुरवात करतील.

**धार्मिक पुनरुज्जीवनाची जरुरी**—अमेरिकेचे इव्हँजेलिस्ट धार्मिक पुढारी मि. बिली ग्रॅहम ह्यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, अमेरिका विकृत माणसांचें राष्ट्र झालेलें आहे. त्यांना झोपण्यासाठीं, जाग येण्यासाठी आणि काम करण्यासाठी सारख्या औषधांच्या गोळ्या घ्याव्या लागतात. सर्व जगच रुग्ण झालेलें असून, परमेश्वराकडे व धर्माकडे परत जाणें हाच त्यावर उपाय आहे.

**उसाची लागवड वाढविणार**—मध्यप्रदेश सरकारनें उसाची लागवड वाढविण्यासाठी आंखलेली योजना चालू वर्षी कार्यान्वित होईल. मध्यप्रदेशांतील उसाची लागवड २९,००० एकरांवरून ७०,००० एकरांपर्यंत वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. उसाचें दर एकरीं पीकहि ३५ टक्क्यांनीं, वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. पाटबंधाऱ्यांच्या नवीन कामामुळें उसाचें क्षेत्र वाढविणें शक्य झालें आहे.

**विमा कॉर्पोरेशनची कचेरी**—येत्या सप्टेंबरपासून आयुर्विमा कॉर्पोरेशनचा कायदा अमलांत येणार आहे. कॉर्पोरेशनची मुख्य कचेरी मुंबईमध्यें ठेवण्यांत यावी अशी मागणी गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे करण्यांत आली आहे. चेंबरनें दिलेल्या कैफियतींत कलकत्त्यापेक्षा मुंबई अधिक योग्य असल्याचा दावा करण्यांत आला आहे.


'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

अन्नाचें रहस्य



बेडेकर मसाले,
लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या
जेवणांत गोडी वाढते
व समाधान वाटतें.
☆ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ☆
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

स्थापना सन १९३५ टे. नं. ३४५१८
दि मराठा मार्केट पीपल्स
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

☆ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ☆
श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. वा. बेंडे, श्री. ज्ञा. मा. मनसूख.
डायरेक्टर्स.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार [illegible]

# अर्थ

बुधवार, ता. २५ जुलै, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांचें बीजारोपण

### लोकमान्यांची कामगिरी

"हिंदी असंतोषाचे जनक, म्हणून लोकमान्य टिळक सुप्रसिद्ध आहेत. बहिष्कार व स्वदेशी ह्यांचेहि ते तितकेच पुरस्कर्ते होते. प्रारंभींच्या काळीं, त्यांनीं जो ध्येयवाद, जी चालना व जें प्रोत्साहन दिलें, त्यालाच महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाचें श्रेय बव्हंशीं दिलें पाहिजे. लोकमान्यांनीं उद्योगधंद्यांचा केवळ पुरस्कारच केला: नाहीं, तर नव्या कारखान्यांच्या स्थापनेच्या प्रयत्नांस प्रत्यक्ष उत्तेजन दिलें. दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ति रानडे, इत्यादींनीं ब्रिटिश राजकीय सत्तेचे आर्थिक दुष्परिणाम स्पष्ट करून दाखविले; पण लोकमान्य टिळकांच्या सारख्या असामान्य नेत्याची औद्योगीकरणाचा संदेश सामान्य माणसांपर्यंत पोंचविण्याची आवश्यकता होती. राष्ट्राचा अभ्युदय व्हावयाचा असेल, तर त्यामधील तरुण ध्येयवादानें भारून गेलेले असावयास हवेत. हा ध्येयवाद त्यांच्यामध्यें पुढाऱ्यांनीं रुजवला पाहिजे. आज आपल्यामध्यें लोकमान्यांच्यासारखा द्रष्टा, महापुरुष पुढारी नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट आहे."

**शं. वा. किर्लोस्कर.**

## भारताचा चलनवाढीचा जुगार ?

### "एकॉनॉमिस्ट" चा अभिप्राय

चालू वर्षीं भारतांतील सरकारी उत्पन्न १९५३–५४ च्या मानानें सवापटीनें अधिक भरेल; वाढत्या करांच्या वसुलीमुळें हें शक्य होईल. मध्यवर्ती व राज्य सरकारें शक्य त्या मार्गांनीं उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि उत्पन्नाचीं नवीं नवीं साधनें शोधून काढलीं जात आहेत. रोजच्या गरजांच्या जिनसांची किंमत त्यामुळें वाढत जाऊन त्या महाग होत आहेत. "चालू वर्षीं, अर्थमंत्र्यांनीं आणखी २६० लक्ष पौंडांची करवाढ केली आहे. त्यासाठी जनतेला जो त्याग करावा लागेल, तो ग्रेट ब्रिटनमधील तत्सम करांसाठी पडणाऱ्या त्यागाच्या दसपट भरेल !" असें एकॉनॉमिस्टनें म्हटलें आहे. भारतांतील करांची पातळी फारच वाढलेली आहे; तरी पण "ही केवळ सुरवात आहे" असें अर्थमंत्री म्हणत आहेत. तुटीची अर्थव्यवस्था, परदेशांची मदत, इत्यादि अपुरी पडून, करवाढ आणि त्यामुळें जनतेच्या उपभोग्य जिनसांत कपात ह्यामार्गेंच पंचवार्षिक योजनेची तरतूद अखेर व्हावी लागेल. खर्चावर कर किंवा संपत्तीवर कर बसविणें कितपत योग्य होईल, ह्याचा सरकार विचार करीत आहे. प्राप्तीची कमाल मर्यादा ठरविण्याचा प्रश्नहि चर्चिला जात आहे; आणि ह्या सर्वांची प्रत्यक्ष करवसुलीच्या दृष्टीनें निष्पत्ति काय होईल ह्याचाहि विचार करावा लागेल. विक्री कर आणि एक्साईज कर ह्यांचे द्वारांच जास्तींत जास्त उत्पन्न सरकारला मिळणें सोपें जाईल, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. कंपन्यांच्या डिव्हिडंडवरील कराची योजना संपत्ति निर्माण करण्याच्या उपक्रमांना बाधक होणारी असली, तरी ६% डिव्हिडंडपेक्षा ज्यास्त डिव्हिडंडची अपेक्षा उद्योगपतींनीं करूं नये, अशी जोंवर सामान्य जनांची कल्पना आहे तोंवर डिव्हिडंडवरील करांतून उद्योगपतींची सुटका होणें अशक्य दिसतें. उद्योगधंद्यांत पत्करावा लागणारा धोका आणि दाखविली जाणारी कार्यक्षमता, ह्यांचेशीं डिव्हिडंडचा कांहीं संबंध असावा लागतो, हें तत्त्वच समजून घेण्यास लोक तयार नसले, म्हणजे असेंच होणार ! अप्रत्यक्ष करांच्या जनतेवरील वाढत्या बोजाचें समर्थन करण्यासाठी, वरिष्ठ नोकरांनीं त्यांना हक्कानें मिळणाऱ्या पगारांत व पेन्शनांत खुषीनें कपात स्वीकारावी, असें आवाहन करण्यांत येत आहे.

करवाढीपेक्षा चलनवाढीची भीति अधिक महत्त्वाची आहे. ट्रझरी बिलें काढून चलन मिळविण्याची सरकारची योजना कितपत यशस्वी होते, ह्यावर सर्व कांहीं अवलंबून आहे; हा सोडतीचा खेळ फलदायी होण्याकडे तज्ञांचें व अर्थखात्याचें सतत लक्ष राहिलें पाहिजे. "पावसानें जरी थोडा दगा दिला, किंवा चलनवाढीच्या धोक्याचा कानोसा येतांच भारतांतील असंख्य छोट्या साठेबाजांनीं प्रत्येकानें थोडीशीं पोतीं धान्य किंवा तेलबिया बाजूला राखून ठेवल्या, कीं किंमती एकदम कडाडतील" असा इशारा एकॉनॉमिस्टनें दिला आहे. सरकार शक्यती दक्षता घेत आहे. अन्न, पोलाद आणि सिमेंट ह्यांची आयात वाढत्या प्रमाणावर केली जात आहे. त्यामुळें, परराष्ट्रीय देणें वाढून घेण्या–देण्यांतील तफावत ज्यास्त प्रतिकूल होण्याचा रंग दिसतो. व्यापारी बँकांचीं वाढतीं कर्जें आटोक्यांत ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें स्वतःकडील अधिकार तत्परतेनें वापरण्यास प्रारंभ केला आहे आणि नवे अधिकार तिला देण्यासाठी कायद्याची तरतूद केली जात आहे. अशा रीतीनें कर्जपुरवठा कमी केला जात असतांना वाढत्या उत्पादनाची भांडवलाची गरजहि वाढत जात आहे. रासायनिक खतांचा उपयोग वाढला कीं पीक ज्यास्त येतें, त्या मानानें कितीतरी ज्यास्त प्रमाणांत शेतकऱ्याला पैशाची गरज निर्माण होते. अद्याप, भारतांतील शेती मुख्यतः पावसावरच अवलंबून असल्याकारणानें, पावसावरच आपली सर्व भिस्त रहाणें अपरिहार्य आहे. त्याचप्रमाणें, परकीय मदतीचा ओघ केव्हां अटेल, ह्याचा कांहींच नेम नाहीं. म्हणून, आपली बचत व करांचें उत्पन्न, ह्यांवरच आपली सर्व मदार हवी. तुटीची अर्थयोजना केवळ सुदैवावर अवलंबून ठेवणें धोक्याचेंच आहे.

## भारत सरकारची यशस्वी कर्जउभारणी

भारत सरकारची कर्जउभारणी यशस्वी झाली आहे. एकूण १५७·१३ कोटी रुपये जमा झाले, त्यापैकी ७७·२१ कोटी रु. रोखीनें, नव्यानें मिळाले.

## अल्युमिनमचा संकल्पित कारखाना

मद्रास राज्यांतील सालेम जिल्ह्यांत अल्युमिनम निर्माण करण्यासाठी लागणारी बॉक्साइटची माती विपुलतेनें आहे. ह्या सामुग्रीचा उपयोग करून ह्या जिल्ह्यांत अल्युमिनम निर्माण करण्याचा विचार भारतीय सरकारनें चालविला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कारखान्याचा समावेश होण्याचा संभव आहे. सुमारें १५ वर्षांपूर्वी डॉ. एम्. एस्. कृष्णन् ह्या तज्ज्ञानें जिल्ह्याची भूगर्भविषयक पहाणी केली होती. त्यावेळीं त्यांनीं असा निष्कर्ष काढला होता कीं, ह्या विभागांत अगदीं कमीत कमी ४० लाख टन बॉक्साइटची माती सापडूं शकेल. तथापि इतर कांहीं तज्ज्ञांच्या मतानें ६० लाख टनापर्यंतहि माती उपलब्ध होऊं शकेल. ह्या भागांत अल्युमिनमचा कारखाना काढण्याची मागणी वारंवार करण्यांत आलेली आहे. कारखाना उभारण्यांत आल्यास त्याला २५ वर्षें तरी कच्च्या मालाचा तुटवडा पडणार नाहीं, असा अंदाज करण्यांत आलेला आहे. भारतीय सरकारच्या उद्योग व व्यापार खात्यानें आपले दोन वरिष्ठ अधिकारी सालेम जिल्ह्यांत प्राथमिक तपासणी करण्यासाठी पाठविण्याचें ठरविलें आहे. हे अधिकारी लवकरच त्या भागांत जाणार असून तेथें उपलब्ध असलेल्या मातीच्या नमुन्यांची परीक्षा करणार आहेत. ही व इतर माहिती गोळा करून भारतीय सरकारकडे एक अहवाल पाठविण्यांत येईल. ह्या माहितीचा विचार करून कशा प्रकारचा व केवढा कारखाना काढावयाचा तें ठरविण्यांत येणार आहे. भारतांतील सध्याचें, अल्युमिनमचें वार्षिक उत्पादन सुमारें २०,००० टन आहे. पण तें वाढवून ४०,००० टनांपर्यंत करण्याचा विचार चालूं आहे.

---

## बँकिंगच्या धंद्याबद्दल सरकारला विनंति

कॅनरा बँक लि., बंगलोर ह्या संस्थेचा सुवर्णमहोत्सव बंगलोर येथें साजरा करण्यांत आला. समारंभाचें अध्यक्षस्थान इंडिअन बँक्स असोसिएशनचे चेअरमन श्री. सी. एच. भाभा ह्यांनीं स्वीकारलें होतें. कॅनरा बँकेनें गेल्या ५० वर्षांत केलेल्या प्रगतीचा गौरवपूर्ण उल्लेख करून श्री. भाभा आपल्या भाषणांत म्हणाले कीं देशांतील लोकांचें जीवनमान अधिक उन्नत करण्याच्या कामीं बँकांना कार्य करतां येईल. त्यासाठीं लोकांमध्यें बचतीच्या संवयीची जोपासना व वाढ करण्याकडे लक्ष पुरविण्यांत आलें पाहिजे. बचत करून सांचविलेला पैसा देशाची साधनसामुग्री वाढविण्यासाठी केला गेला पाहिजे. बँकिंगच्या व्यवसायांत उद्‌भवणाऱ्या दुसऱ्या एका मुद्याचा विचार होणें अगत्याचें आहे. बँकर आणि त्याचें गिऱ्हाईक ह्यांच्या दरम्यान होणाऱ्या व्यवहारांची गुप्तता पाळली गेली पाहिजे. पण ह्या बाबतींत रिझर्व्ह बँकेनें आपल्या वजनाचा व अधिकाराचा पूर्ण उपयोग केल्याचें दिसत नाहीं. प्राप्तीवरील कायद्यांत ज्या दुरुस्त्या करण्यांत आल्या, त्यावरून ही गोष्ट उघड होत आहे. देशांत बँकिंगच्या व्यवसायाचा विकास निरोगी पद्धतीनें व्हावयास पाहिजे असेल तर अशा दुरुस्त्या त्याच्या आड येणाऱ्या ठरतील. बँका आणि बँकिंगचा व्यवसाय ह्यांच्यावर अनेक निर्बंध घालण्यांत आले आहेत. अशा निर्बंधांमुळें बँकिंगच्या धंद्याच्या प्रगतीवर अनिष्ट परिणाम होण्याचा धोका आहे ही गोष्ट लक्षांत घेण्यांत आली पाहिजे. म्हणून ह्या व्यवसायांत होणारा सरकारी हस्तक्षेप अगदीं किमान असला पाहिजे. तरच देशाच्या अर्थव्यवस्थेंत बँकिंगच्या वाला जें महत्त्वाचें कार्य करावयाचें आहे, तें करतां येईल.

## “ द..ळानें अ..लाच्या गर..ना फायदा घेऊं नये ”

### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय

“ वकीलमंडळीचें कार्य समाजाच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें असें कार्य आहे आणि याच कारणामुळें वकिलाचें स्वतःच्या बाबतींत जसें कांहीं एक कर्तव्य असतें, तसेंच समाजाच्या बाबतींतहि त्यानें कांहीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत. तेव्हां आपली वकील–फी आकारतांना अशील गरजवंत आहे म्हणून मनास येईल तशी फी आकारूं नये, तसेंच तीं त्याच्या ऐपती-बाहेरहि राहूं नये ” असा अभिप्राय मुंबई हायकोर्टाचे सरन्यायाधीश न्या. एम्. सी. छगला व न्या. श्री. दीक्षित यांनीं भडोचचे वकील श्री. जे. सी. गांधी यांच्या खटल्याच्या बाबतींत प्रकट केला. मुंबईच्या वकीलकायद्याच्या संबंधानें हा खटला सुरू होता.

भडोच येथील साकरलाल रामजी भाई यांनीं भडोचच्या गुजराथ गूळ सप्लाय कं. च्या विरुद्ध एक खटला दाखल केला होता व त्याचे वतीनें श्री. जे. सी. गांधी वकील हे काम पाहत होते. श्री. साकरलाल व श्री. गांधी वकील यांच्यांत असा करार झाला होता कीं साकरलाल यांनीं गांधी वकिलांना २५० रु. प्रथम द्यावेत व न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या रकमेच्या २५ टक्के रक्कम नंतर द्यावी. निकालानंतर श्री. साकरलाल यांनीं श्री. गांधी वकील यांना ५२४ रु. च दिले, परंतु वकील गांधी यांनीं ५,०११ रु. ची मागणी केली. सिव्हिल कोर्टानें हा करार सार्वजनिक नीतीच्या विरुद्ध असल्याचें ठरवून खटला फेटाळून लावला, तेव्हां श्री. गांधी यांनीं हायकोर्टाकडे दाद मागितली. त्या दरम्यान श्री. साकरलाल यांनीं श्री. गांधी यांचे विरुद्ध ‘ व्यावसायिक नीतीच्या ’ विरुद्ध वर्तन केल्याच्या आरोपावरून जिल्हान्यायाधीशाकडे दुसरा खटला दाखल केला, व उच्च न्यायालयाकडे याविषयीं अभिप्राय मागितला.

यावर अभिप्राय व्यक्त करतांना न्यायमूर्ति म्हणाले, “ न्यायदान व वकिलीचा व्यवसाय या दोन्हींच्या हिताच्या दृष्टीनें वकिलांनीं कांहीं नियमांचें पालन केलेंच पाहिजे. साधारणतः वकिलांनीं प्रथमतः काम स्वीकारण्यापूर्वींच आपली फी निश्चित करावी. साकरलाल यांच्या कराराच्या बाबतींत श्री. गांधी यांनीं व्यावसायिक नीतिविरुद्ध वर्तन केलें आहे, असें मानतां येणार नाहीं. तरी वकिलानें आपल्या अशिलापासून योग्य तेवढीच फी आकारावी; व्यवसायाच्या प्रतिष्ठेला शोभणार नाहीं अशी अत्यधिक फी उकळूं नये. ” या बाबतींत तसें कांहीं घडलेलें नाहीं, असेंहि न्यायाधिशांनीं मत व्यक्त केलें.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना १९१८.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
राष्ट्राकरितां बचत क.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | ७,५८,९०० |
| रिझर्व | रु. | ६,९७,००० |
| ठेवी | रु. | १,५२,००,००० |

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

## हिंदी चलनांतील वाढ

( आंकडे लक्ष रुपयांचे )

| | प्रसारांतील नोटा | | | प्रसारांत वाढ ( + ) अथवा घट ( − ) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नोटा १ | रुपये २ | एकूण ३ | नोटा ४ | रुपये ५ | दुय्यम नाणीं ६ | एकूण ७ |
| १९५०–५१ | १,२०४,२४ | १३८,४५ | १,३४२,६९ | + ८३,८९ | + ५,८४ | − ३,२० | + ८६,५३ |
| १९५१–५२ | १,०९७,९४ | १२५,४५ | १,२२३,३९ | − १००,२१ | − १३,०० | − ३,०५ | −११६,२६ |
| १९५२–५३ | १,०८९,५५ | ११९,७१ | १,२,०९६६ | − ७,९९ | − ५,७४ | − ४,०९ | − १७,८२ |
| १९५३–५४ | १,१४२,९२ | ११७,९२ | १,२६०,६७ | + ५२,८१ | − १,७९ | − ३,१७ | + ४७,८५ |
| १९५४–५५ | १,२३३,९५ | ११२,९८ | १,३४६,९० | + ९१,१७ | − ४,९४ | − १,१४ | + ८५,०९ |
| १९५५–५६ | १,४२३,४७ | १२२,१३ | १,५४५,६० | + १८९,५५ | + ९,१५ | + १,४७ | +२००,१७ |

## प्रसारांतील हिंदी चलनी नोटा

( १, ५ व १० हजारांच्या नोटांची रक्कम वगळली आहे. )

| डिसेंबर अखेर | २ रु. १ | एकूणशीं प्रमाण २ | ५ रु. ३ | एकूणशीं प्रमाण ४ | १० रु. ५ | एकूणशीं प्रमाण ६ | १०० रु. ७ | एकूणशीं प्रमाण ८ | एकूण ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | २५,१५ | २.२ | १६६,०३ | १४.१ | ४८३,८७ | ४१.१ | ५००,९८ | ४२.६ | १,१७६,०३ |
| १९५१ | २५,४३ | २.२ | १५७,४१ | १३.६ | ४७७,४५ | ४१.१ | ५००,९० | ४३.१ | १,१६१,१९ |
| १९५२ | २३,४३ | २.१ | १४१,२० | १२.७ | ४६१,६४ | ४१.४ | ४८७,४९ | ४३.८ | १,११३,७६ |
| १९५३ | २४,८५ | २.२ | १४४,७२ | १२.६ | ४८४,४१ | ४२.२ | ४९४,२१ | ४३.० | १,१४८,१९ |
| १९५४ | २६,५२ | २.२ | १५०,५७ | १२.३ | ५११,५० | ४१.६ | ५०२,०२ | ४०.९ | १,२२८,७२ |
| १९५५ | २८,६६ | २.१ | १५९,३६ | ११.६ | ५९२,८९ | ४०.० | ५५०,०५ | ४०.१ | १,३७२,९९ |

## उघडकीस आलेल्या बनावट नोटा

| वर्ष | १ रु. | २ रु. | ५ रु. | १० रु. | १०० रु. | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | संख्या | रक्कम रु. |
| १९५०–५१ | २,४०० | ८४ | १,६७६ | २,७८३ | १८२ | ७,१२५ | ५६,९७८ |
| १९५१–५२ | ३,३३४ | ३५ | १,६६९ | १,९०१ | १४८ | ७,०८७ | ४५,५५९ |
| १९५२–५३ | ४,२५७ | ७४ | ९६९ | १,०६० | २३८ | ६,५९५ | ४३,६३६ |
| १९५३–५४ | ६,२५० | ६३ | १,०७१ | १,६०३ | ४६ | ९,०३३ | ३२,३६१ |
| १९५४–५५ | ६,७८५ | ८३८ | १,६२५ | १,७८५ | २,११७ | १३,११० | २,५९,१३६ |
| १९५५–५६ | ६,१३६ | १५२ | ८१३ | २,२२० | १७५ | ९,४९६ | ५०,२०५ |

## टांकसाळींत किती नाणीं पाडलीं !

| | मुंबई रु. आ. | अलिपूर रु. आ. | एकूण रु. आ. |
|---|---|---|---|
| निकेलचा रुपया ... | — | — | — |
| " अर्ध रुपया ... | १,००,०००–० | १,२८,८८,०००–० | १,२९,८८,०००–० |
| " पावली ... | — | १,२३,४२,०००–० | १,२३,४२,०००–० |
| कप्रो निकेल २ आणे ... | — | — | — |
| " १ आणा ... | १,७६,०००–० | — | १,७६,०००–० |
| " अर्धा आणा ... | १,४१,५००–० | २,२५,५००–० | ३,६७,०००–० |
| नया पैसा ... | १,३०,५००–० | १५–६ | १,३०,५१५–६ |
| एकूण ... | ५,४८,०००–० | २,५४,५५,५१५–६ | २,६०,०३,५१५–६ |

## जपानी लोकांच्या रहाणींत झालेला बदल

गेल्या कांहीं वर्षांत जपानमधील लोकांच्या रहाणींत पडलेल्या फरकासंबंधीचा एक अहवाल सरकारच्या इकॉनॉमिक प्लॅनिंग बोर्डातर्फे प्रसिद्ध करण्यांत आला आहे. जपानी नागरिकांच्या आहारांत तांदूळ हा पदार्थ पूर्वी फार मोठ्या प्रमाणावर असे. परंतु अलीकडे जपानी लोक इतर धान्येंहि अधिक खाऊं लागलेले आहेत. सुमारें २० वर्षांपूर्वी आहारांत ८५·५ टक्के भाग तांदुळाचा असे. आतां तांदुळाचें प्रमाण ६९·३ टक्क्यांवर आलें आहे. जपानमध्यें होणारा तांदूळ तेथील लोकांना पुरेसा पडत नसल्या-मुळें खाण्यांत इतर धान्यें वापरण्याचा प्रयोग करण्यांत येत असण्याचा संभव आहे. पण हें धान्य जपानला बाहेरून आयात करावें लागतें. गेल्या वीस वर्षांच्या कालांत जपानी लोक प्रथिनयुक्त आहार अधिक प्रमाणांत घेऊं लागले आहेत. जपान-मधील दूध, लोणी, अंडीं, इत्यादि पदार्थांचा खप वाढलेला आहे. वृत्तपत्रें वाचण्याची संवयहि जपानमध्यें बरीच अधिक प्रसृत झालेली आहे. जपानमध्यें रोज १० लाख प्रती खपणारीं चार मोठीं दैनिकें आहेत. कापडावरील व फर्निचरवरील खर्चांतहि वाढ झालेली दिसून येते. जपानी घरांतून फर्निचर वापरण्याची पद्धत कांहीं वर्षांपूर्वी नव्हती. करमणुकीवरील खर्चांत गेल्या वर्षी २६ टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. पण त्यांतहि जुगारावरील खर्च अधिक वाढलेला आहे. घरगुती उपयोगासाठी वापरण्यांत येणाऱ्या विजेचा खपहि युद्धपूर्व काळापेक्षा तिप्पटीनें अधिक झालेला आहे. हा सर्व बदल जपानमधील अमेरिकन लष्कराच्या वास्तव्यामुळें झाला असण्याचा संभव आहे.

---


## अन्नधान्यावर नियंत्रणें येणार नाहींत

भारतीय सरकारचे अन्नमंत्री श्री. अजितप्रसाद जैन ह्यांनीं भोपाळ येथें एका मोठ्या पिठाच्या गिरणीचें उद्घाटन केलें. ही गिरणी यंत्रसामुग्रीच्या बाबतींत अद्यावत् असून आशिआ खंडांतील तिसऱ्या क्रमांकाची आहे, असें समजतें. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. जैन म्हणाले कीं, कांहीं लोकांकडून अन्नधान्याच्या बाबतींत नियंत्रणाची व वांटपपद्धतीची मागणी करण्यांत येत आहे. पण ही पद्धत सुरू करण्याविरुद्ध मी आपलें सर्व वजन खर्च करीन. खुल्या बाजारांत तांदुळाच्या व गव्हाच्या किंमती भडकून जाऊं नयेत म्हणून सरकारनें दोन्ही अन्नधान्यांचे सांठे करून ठेवण्याची व्यवस्था केली आहे. बाजारपेठेंत किंमती चढूं लागल्यामुळें त्या काबूंत ठेवणें आवश्यक वाटल्यास सरकार सांठ्यांतील धान्याची विक्री तेथें करूं लागेल. गव्हाची दर मणामागें १४ रुपयांप्रमाणें घाऊक विक्री करण्यांत येईल. तांदुळाच्या घाऊक विक्रीचा भाव मणामागें १६ रुपये राहील. परराष्ट्रांतून गहूं आयात करण्यांत येत असून चालू वर्षी सरकारजवळ १२ लाख टन गव्हाचा सांठा होईल. त्याशिवाय अमेरिकेकडून ३० लाख टन गहूं आयात करण्यासंबंधीं बोलणीं चालू आहेत. तांदुळाच्या पुरवठ्याबद्दल ब्रह्मदेशाशीं नुकताच करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें येत्या ५ वर्षांत ब्रह्मदेशाकडून २० लाख टन तांदूळ आयात करण्यांत येईल. सरकारनें वखारी बांधण्याच्या योजना हातीं घेतल्या आहेत. ह्या योजना पूर्ण झाल्यावर दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेच्या अखेरीस भारतांत ६५ लाख टन अन्नधान्य शास्त्रीय पद्धतीनें, खराब न होतां, सांठविण्याची सोय होईल.

५०
वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

सांडू
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक


दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर-मुंबई.

किर्लोस्कर
शेंगायंत्रें

या यंत्राकडून दर तासाला ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जात असून तें चालविण्यास ६ ते ८ अश्वशक्ति लागते. याशिवाय लहान प्रमाणावर हातानें व पॉवरवर चालणारीं यंत्रें मिळतात.
सविस्तर माहितीसाठी लिहा.
"कल्याण" पॉवर शेंगा यंत्र
किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी

## धनकोजवळील तारण मालाची विक्री

### कराराचा फायदा : पाटणा हायकोर्टाचा निवाडा

भारत बँक लि. ह्या बँकेचें मुख्य कार्यालय दिल्लीला असून तिच्या देशांत पुष्कळशा गांवीं शाखा आहेत. तिची एक शाखा मुझफ्फरपूरलाहि आहे. शिवजीप्रसाद नांवाचा एक इसम मुझफ्फर-पूर जिल्ह्यांत धान्याचा व्यापार करीत होता. मेसर्स रामगणेश रामशिवजीप्रसाद ह्या नांवावर तो व्यापार करीत असे. धान्य तारण ठेवलें जाऊन १,००,००० रुपयांपर्यंत कॅश क्रेडिट अकाऊंट उघडला जावा म्हणून शिवजीप्रसादनें बँकेला नोव्हेंबर १९४४ मध्यें प्रार्थना केली. बँकेनें शिवजीप्रसादचें म्हणणें मान्य केलें आणि ता. १-३-१९४५ ला कॅश क्रेडिट अकाऊंट उघडण्याबाबत मंजुरी दिली. शिवजीप्रसादनें त्या दिवशीं बँकेला १,००,००० रुपयांची प्रॉमिसरी नोट लिहून दिली आणि व्याजाचा दर रिझर्व्ह बँकेपेक्षा द. साल द. शेंकडा १ रुपयानें जास्त देण्याचें कबूल केलें. शिवजीप्रसादनें धान्याचा सांठा बँकेच्या ताब्यांत दिला.

त्यानंतर ता. २१-९-१९४५ ला त्यांच्यांत रुपयांच्या देण्या-घेण्याबाबत हिशेब झाला. त्यांत बँकेला १८,४४८ रु. १० आ. ३ पै शिवजीप्रसादपासून घ्यावयाचे आहेत असें आढळून आलें. ता. २२-९-१९४५ ला शिवजीप्रसादनें बँकेला ती रक्कम द्यावयाची आहे ह्याची कबुली दिली. त्यानंतर बँकेनें त्या रकमेची शिवजीप्रसादला मागणी केली. शिवजीप्रसादनें ती रक्कम न दिल्यामुळें बँकेनें ता. २९-११-१९४५ ला तिच्या ताब्यांतील हरबऱ्यांची विक्री केली. मेसर्स रामलगनसाह बालकुंवरप्रसाद ह्यांनीं तो हरबरा ९,२०० रुपयांला विकत घेतला. शिवजी-प्रसादनें पुनः २,५०० रुपये बँकेंत जमा केले. ती सर्व रक्कम वजा जातां बँकेला शिवजीप्रसादपासून पासून ७,३५७ रु. १५ आ. ३ पै घ्यावयाचें राहिले होते. त्यानंतर बँकेनें त्या रुपयाबाबत शिवजीप्रसादवर एक दिवाणी दावा लावला.

बँकेच्या दावेअर्जातील विधानांना शिवजीप्रसादनें हरकत घेतली. त्यानें हरकतींत बँकेचे त्याला १८,४४८ रु. १० आ. ३ पै द्यावयाचे होते ही गोष्ट कबूल केली. पण बँकेच्या ताब्यांत ३,३५० मण हरबऱ्याचा जो सांठा ठेवला होता, तो बँकेनें त्याला यथोचित आणि इष्ट नोटीस न देतांना विकला. बाजार-भावाप्रमाणें त्याचा माल ३२,६६२ रु. ८ आ. ० पै ला विकावयाला पाहिजे होता. त्याला त्या मालाबाबत वरील रक्कम मिळाली पाहिजे. त्याशिवाय माल भरलेल्या पोत्यांच्या किंमतींत २,५०० रु. मिळाले पाहिजे. बँकेचें त्याला देणें नसून त्यालाच बँकेपासून बाकी रक्कम घ्यावयाची आहे. सबब, बँकेचा दावा खारीज व्हावा अशी त्यानें मागणी केली.

त्यावर अव्वल कोर्टानें बँकेचा दावा खारीज केला. अव्वल कोर्टानें निर्णयांत असें ठरविलें कीं, शिवजीप्रसादचा जो माल तारण म्हणून बँकेच्या ताब्यांत होता तो विकण्यापूर्वी बँकेनें यथोचित आणि इष्ट अशी नोटीस शिवजीप्रसादला दिली नाहीं. त्या मालाची ९ रु. १२ आ. ० पै मण ह्या दरानें एकूण ३२,६६२ रु. ८ आ. ० पै किंमत असून शिवाय पोत्याची किंमत २,५०० रुपये होते. अव्वल कोर्टानें शिवजीप्रसादला बँकेवर डिक्री दिली. अव्वल कोर्टाच्या डिक्रीवर बँकेनें हाय-कोर्टांत हें अपील दाखल केलें आहे. प्रस्तुतच्या अपिलांत बँकेला शिवजीप्रसादवर डिक्री मिळूं शकते कीं, काय हें आपल्याला ठरवावयाचें आहे.

बँकेतर्फे करण्यांत आलेल्या युक्तिवादांतून असें सांगण्यांत आलें आहे कीं, बँकेनें शिवजीप्रसादच्या उपस्थितींत हरबऱ्यांची विक्री केली आणि त्यानें तिला संमति दिली होती. सबब, बँकेनें केलेली विक्री त्याला बंधनकारक ठरते. प्रस्तुतच्या केसमध्यें एक्झि-१ (अ) हें एक पत्र आहे. त्यांत शिवजीप्रसादनें हरबऱ्यांच्या विक्रीला मंजुरी दिली असा मजकूर आहे. मॅनेजरनें आपल्या साक्षींत तें पत्र शिवजीप्रसादनें दिलें असें सांगितलें आहे. पण ह्या पत्रावर शिवजीप्रसादची सही नाहीं किंवा तें पत्र त्यानें लिहिलें असें सिद्ध झालेलें नाहीं. अशा परिस्थितींत मॅनेजरच्या साक्षीवरून तें पत्र शिवजीप्रसादचें असल्याचें ठरूं शकत नाहीं. शिवजी-प्रसादनें तें पत्र दिल्याचें नाकबूल केलें आहे. बँकेनें शिवजी-प्रसादचें ता. २३-११-१९४५ ला तिला आलेलें पत्र केसमध्यें दाखल केलें आहे. पण त्यांत त्यानें बँकेला रक्कम द्यावयाचें कबूल केलें असून त्याच्या मालाची विक्री ता. २६-११-१९४५ ला न करण्याबाबत विनंती केली. पण बँकेनें ता. २९-११-१९४५ ला मालाची विक्री केली.

कराराच्या कायद्यांतील कलम १७६ खालीं ज्या इसमाजवळ तारण म्हणून माल ठेवला असेल त्याला नोटीस दिल्यानंतर विकण्याचा हक्क दिला आहे. पण मालाची विक्री करण्यापूर्वी माल ठेवणाऱ्या इसमाला मालाच्या विक्रीबाबत कायदेशीर नोटीस द्यावयाचे बंधनकारक ठरविलें आहे. त्या नोटिसांत मालाच्या विक्रीबाबत तपशील आणि यथोचित मुदत लिहावी लागते. त्यानंतर मुदतीच्या आंत विक्री होतपर्यंत मालधन्याला रक्कम देऊन त्याचा माल सोडविण्याचा हक्क असतो. ह्या केसमध्यें बँकेनें शिवजीप्रसादला कलम १७६ खालीं जो नोटीस द्यावयाला पाहिजे तो दिला नाहीं असें आम्ही ठरवितों. सबब, खालील कोर्टांनीं बाजारभावाप्रमाणें तो माल ३२,६६२ रु. ८ आ. ० पै किंमतीचा होता असें ठरविल्यामुळें बँकेला शिवजीप्रसादपासून घ्यावयाचें सर्व रुपये वसूल झाले आहेत असें आम्ही ठरवितों. ज्यानें माल तारण ठेवला असेल त्याहि इसमाला ज्याच्यापाशीं माल तारण ठेवला त्याच्यावर दावा करण्याचा अधिकार आहे. मालाची बेकायदेशीरपणें विक्री केली गेल्यास तारण ठेवणाऱ्या इसमाला तारण ठेवलेल्या इसमावर मालाबाबत दावा करतां येईल. प्रस्तुतच्या केसमध्यें बँकेला शिवजीप्रसादपासून घेणें असलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम मिळाल्यामुळें आम्ही अव्वल कोर्टानें दिलेली डिक्री कायम ठेवतों.

वरील कारणांस्तव बँकेनें दाखल केलेलें अपील आम्ही फेटाळून लावतों.

सारांश—ऋणकोनें तारण म्हणून कांहीं माल धनकोपाशीं ठेवून कर्ज काढल्यास आणि ऋणकोनें धनकोची कर्जफेड न केल्यास धनकोला त्याच्यापाशीं तारण ठेवलेला ऋणकोचा माल विकून कर्जाची फेड करून घेतां येईल. पण तो माल विकण्यापूर्वी कराराच्या कायद्यांतील कलम १७६ खालीं धनकोनें माल विक्री-बाबत ऋणकोला यथोचितपणें आणि इष्टपणें नोटीस देणें हें बंधनकारक राहील.

धनकोनें ऋणकोला दिलेली नोटीस ही योग्य आणि इष्ट नसेल आणि त्यानें ऋणकोचा माल विकून टाकला असेल तर ऋणकोला धनकोवर दावा लावतां येऊन त्याच्या मालाच्या किंमतीची मागणी करतां येईल. इष्ट नोटिसीच्या अभावीं धनकोनें ऋणकोचा माल जो विक्री केला तो स्वतःच्या उपयोगीं आणला असें मानलें जाईल.

—न्यायबोध, जुन १९५६

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक, फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग–व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली — चेअरमन
श्री. महादेव बाळाप्पा चौगुले, कोल्हापूर — व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा,
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर, B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# बँक ऑफ पूना लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

—मुख्य कचेरी : ४५५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

( १ ) ३६१ सदाशिव, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सोलापूर. ( ४ ) सांगली.

—:व्याजाचे दर:—

चालू ठेव–अर्धा टक्का. सेव्हिंग्ज–दोन टक्के.
२ महिन्यांच्यापुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

☆ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिन्नस सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.